माहिती हवीय?

भरत चंद्रकांत कालुवाला, माहिम.

☐ *दीवार, डॉन, अमर अकबर ॲन्थोनी, जानी दुश्मन, घरौंदा, गोलमाल, मेरे अपने, जख्मी* हे चित्रपट केव्हा प्रदर्शित झाले? कलाकार, संगीतकार, निर्माता-दिग्दर्शक कोण?

– *दीवार* दोनदा आला. पहिला *दीवार* १९५५ला आला होता. कलाकार शेख मुख्तार, मुनवर सुलताना, करण दीवान, कुलदीपबाबू राजे, डब्ल्यू. एम. खान, अन्वर हुसेन, शेख, शम्मी, इंद्रलोग पिक्चर्सने हा *दीवार* निर्माण केला होता. दिग्दर्शक एस. खलिल, संगीत महंमद शफी(रफी नव्हे), दुसरा *दीवार* १९७५ला आला होता. कलाकार अमिताभ बच्चन, शशी कपूर, परवीन बाबी, नीतू सिंह, मनमोहन कृष्ण, इफ्तेकार, सत्येन कप्पू, मदनपुरी व निरुपा रॉय. निर्माता गुलशन राय, दिग्दर्शक यश चोप्रा, संगीत आर. डी. बर्मन.

डॉन १९७८ला आला होता. कलाकार अमिताभ बच्चन, झीनत अमान, हेलन, कमल कपूर, प्राण, इफ्तेकार, ओम शिवपुरी, शेट्टी, निर्माता नरीमन इराणी, दिग्दर्शक चंदर बारोट, संगीत कल्याणजी-आनंदजी.

अमर अकबर ॲन्थोनी १९७७ला आला होता. कलाकार अमिताभ बच्चन, विनोद खन्ना, ऋषी कपूर, परवीन बाबी, शबाना आझमी, नीतू सिंह, प्राण, जीवन, निरुपा रॉय, रणजीत, मुक्री, निर्माता-दिग्दर्शक मनमोहन देसाई, संगीत लक्ष्मीकांत-प्यारेलाल.

जानी दुश्मन दोनदा आलाय. १९७९ला पहिला कलाकार सुनील दत्त, रीना रॉय, जितेंद्र, शत्रुघ्न सिन्हा, प्रेमनाथ, संजीवकुमार, रेखा, अमरीश पुरी, विक्रम, बिंदिया गोस्वामी, अरुणा इराणी, विनोद मेहरा, निर्माता-दिग्दर्शक राजकुमार कोहली, संगीत लक्ष्मीकांत-प्यारेलाल. राजकुमार कोहलींनी याच *जानी दुश्मन*ची एक रिमेक नुकतीच पडद्यावर आणलीय. कलाकार सनी देओल, सुनील शेट्टी, अक्षयकुमार, मनीषा कोईराला, रंभा, अरमान कोहली, आदित्य पंचोली, सोनू निगम, संगीत आनंद राज आनंद, आनंद-मिलिंद, संदीप चौटा.

नागिन या नावाचा चित्रपट तीन वेळा आलाय. १९३४ला पहिला. कलाकार अन्वरी, आय. टी. निंबाळकर, चंदू, राधा, अमन, निर्माता राधा फिल्म कार्पोरेशन, दिग्दर्शक ज्योतिश बानर्जी, संगीत केळकर. दुसरा *नागिन* १९५४ला आला होता. कलाकार वैजयंतीमाला, प्रदीपकुमार, मुबारक, जीवन आय. एस. जोहर, सुलोचना रुबी मायर्स, कृष्णाकुमारी, कमल, रामावतार, दिग्दर्शक नंदलाल जसवंतलाल, संगीत हेमंतकुमार. १९७६ला तिसरा *नागिन* आला होता. कलाकार सुनील दत्त, जितेंद्र, रीना रॉय, मुमताज, रेखा, योगिता बाली, विनोद खन्ना, फिरोज खान, कबीर बेदी, नीलम मेहरा, प्रेमा नारायण, संजय खान, अनिल धवन, हीना कौसर, प्रेमनाथ, अरुणा इराणी, रणजित, कोमिला विर्क, जगदीप, गुलशन अरोरा, आरती, सुलोचना, अनिता गुहा, मारुती, निर्माता-दिग्दर्शक राजकुमार कोहली, संगीत लक्ष्मीकांत प्यारेलाल.

महुआ १९६९ला आला होता. कलाकार अंजना मुमताज, शिवकुमार, मुराद, फराह, प्रेमनाथ, असित सेन, जानकीदास, उल्हास, बद्रीप्रसाद, निर्माता-दिग्दर्शक, बी. मित्रा, संगीत सोनिक ओमी.

घरौंदा १९७७ला आला होता. कलाकार अमोल पालेकर, झरीना वहाब, साधू मेहर, श्रीराम लागू, जलाल आगा, दीना पाठक, टी. पी. जैन, वली, प्रीतम, निर्माता-दिग्दर्शक भीमसेन. संगीत जयदेव.


गोलमाल १९७९ला आला होता. कलाकार अमोल पालेकर, बिंदिया गोस्वामी, उत्पल दत्त, डेव्हिड, ओमप्रकाश, देवेन शर्मा, अमिताभ बच्चन(पाहुणा कलाकार), निर्माता एन. एन. सिप्पी, हृषिकेश मुखर्जी, दिग्दर्शक हृषिकेश मुखर्जी, संगीत आर. डी. बर्मन.


मेरे अपने १९७१ला आला होता: कलाकार. मीनाकुमारी, विनोद खन्ना, शत्रुघ्न सिन्हा, योगिता बाली, असरानी, पेंटल, मेहमूद, देवेन वर्मा, अभी भट्टाचार्य, असित सेन, क्रेस्तो मुखर्जी, देव किशन, राज मेहरा, मास्टर चिंटू, सुमिता संन्याल, रमेश देव, लीला मिश्रा, निर्माता रोमू एन. सिप्पी, राज एन. सिप्पी, दिग्दर्शक गुलजार, संगीत सलिल चौधरी.

जखमी १९७५ला आला होता. कलाकार सुनील दत्त, आशा पारेख, तारीक, रीना रॉय, इम्तियाज खान, राकेश रोशन, आगा, हेलन, जॉनी वॉकर, कमल कपूर, निर्माता ताहीर हुसेन, दिग्दर्शक राजा ठाकूर, संगीत भप्पी लाहिरी. ✦

पी. एस. म्हापसेकर, म्हापसा गोवा.

☐ ए. व्ही. एम.च्या *चोरी चोरी*नंतर 'चोरी चोरी' या नावाने किती चित्रपट आतापर्यंत पडद्यावर आलेत? कलाकार, दिग्दर्शक व संगीतकार कोण?





चोरी चोरीमध्ये नरगिस-राज कपूर आणि आगामी चोरी चोरीची जोडी राणी मुखर्जी-अजय देवगण

– ए. व्ही. एम.च्या *चोरी चोरी*नंतर १९७३ला एक *चोरी चोरी* आला होता. संजय खान, राधा सलुजा, भगवान, सुंदर, जागिरदार, असित सेन, बिंदू, धुमाळ, सिम्मी, पेंटल, मोहन चोटी, जगदीप या *चोरी चोरी*चे प्रमुख कलाकार होते. निर्माता-दिग्दर्शक शक्ती सामंतांनी या *चोरी चोरी*त प्रमुख भूमिका केली होती. केवल पी. कश्यप निर्माता-दिग्दर्शक होते. ए. व्ही. एम.च्या *चोरी चोरी*चे संगीतकार शंकर-जयकिशनच या *चोरी चोरी*चे संगीतकार होते. १९७३च्या या *चोरी चोरी*नंतर एक *चोरी चोरी* आता प्रकाशनाच्या मार्गावर आहे. कलाकार अजय देवगण, राणी मुखर्जी, सोनाली बेंद्रे, दिग्दर्शक मिलन लुथरिया, संगीत साजिद-वाजिद.